पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ६५ दिनांक ०४/११/२०२४**

# विनापरवाना अग्नीशस्त्र बाळगणाऱ्या आरोपींवर पालघर पोलीसांकडून कारवाई

आगामी सार्वत्रीक विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून संपुर्ण महाराष्ट्रात आदर्श आचारसहिता लागू करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांना पालघर जिल्हयात चालणारे अवैध धंदे, विनापरवाना अग्नीशस्त्र बाळगणारे इसम यांचेविरूध्द कारवाई करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने पालघर पोलीस ठाणे यांचेकडून खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

प्रभारी अधिकारी, पालघर हे दिनांक ०१/११/२०२४ रोजी २३.०० वा ते ०२/११/२०२४ रोजी ०५.०० वा पावेतो पालघर विभागीय सेक्टर गस्त करीत असतांना सेक्टर गस्तीदरम्यान पालघर येथे चेकींग करीत असतांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाल्याने पालघर पोलीस ठाणे हद्दीत रात्रौगस्त करीता नेमण्यात आलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पालघर रेल्वे स्टेशन परिसरात बोलावून मिळालेली बातमी सांगुन बातमीची शहानिशा करुन रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचला असता, एक संशयीत इसम रेल्वे स्टेशन परिसरात संशयीतरित्या फिरत असतांना मिळून आला त्यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे नाव शुभम सुभाष सिंग , वय २९ वर्षे, रा. गगनदिप कॉलनी, भटीयावेट लुधीयाना, जि. लुधीयाना, राज्य-पंजाब असे सांगितले सदर इसमाची झडती घेतली असता त्याचे ताब्यात १) १,४५,०००/- लोखंडी बॉडी असलेले पिस्टल, २) २१,०००/- रु. कि. ०७ जिवंत काडतुसे असा एकुण १,६६,०००/- रु. किमंतीचे घातक शस्त्रे विनापरवाना जवळ बाळगली असतांना मिळुन आल्याने नमुद इसमास ताब्यात घेवुन, त्याचे ताब्यातील घातक हत्यारे जप्त करण्यात आली आहेत. नमुद इसमाचे विरुध्द पालघर पोलीस ठाणे गु.र.नं. २४०/२०२४ भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३, २५ (१) प्रमाणे दिनांक ०२/११/२०२४ रोजी १०.४२ वाजता दाखल गुन्हा दाखल करण्यात आला गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक श्री. अविनाश वळवी नेम. पालघर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

आरोपी शुभम सुभाष सिंग याचेकडे अधिक तपास केला असता त्याने घातपात करण्याचे उद्देशाने हत्यार घेवून आल्याची कबुली देवून सांगीतले की, माझे ओळखीचा नाशिक जेल मध्ये अंबड पोलीस स्टेशन नाशिक शहर यांचेकडील दाखल गुन्हयातील खुनासह दरोडयातील आरोपीत परमिंदर ऊर्फ गौरव राजेंद्र सिंग तसेच सातपुर पोलीस ठाणे येथे खुनाचा प्रयत्न दाखल गुन्हयातील आरोपी आशिष राजेंद्र जाधव या दोन्ही आरोपी यांना संबंधीत पोलीस ठाणे यांनी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी कायदया (मोक्का) अंतर्गत कारवाई केलेली आहे. दोन्ही आरोपी नाशिक जेल मध्ये अटक आहेत. त्यांनी पालघर गुन्हयातील अटक आरोपीस जेल मधुन फोन करुन हत्यार नाशिक येथे घेवून येणे बाबत सांगीतले होते. नाशिक येथे आल्यावर आशिष जाधव याचा वैरी राहूल पवार रा. गंगापुर नाशिक यास जिवे ठार मारण्यासाठी सदर हत्याराचा वापर करण्याबाबत शुभम सिंग यास सांगीतले होते. त्याकरीता आरोपीत यांनी सदर हत्यार मनिष सिंग, मुंगेर बिहार यांचेकडुन मिळविले होते. त्याबाबत दिनांक ०२/११/२०२४ रोजी आरोपी शुभम सिंग

यास त्याचेकडील गावठी पिस्टल व ७ जिवंत राऊंडसह ताब्यात घेवून वरील गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. गुन्हयाचा अधिक तपास चालु आहे.

सदरची कारवाई मा.श्री.बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर जिल्हा, मा.श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, मा.श्री. अभिजीत धाराशिवकर उप विभागीय पोलीस अधिकारी, विभाग पालघर यांचे मार्गदर्शना खाली श्री.अनंत पराड, पोलीस निरीक्षक, प्रभारी पालघर पोलीस ठाणे, पो.उप.निरी/अविनाश वळवी, पो उप निरी/संकेत पगडे, सफौ खंडागळे, पोहवा/अशोक तायडे, पोहवा/ राऊत, पोहवा/ खरपडे, पोना/१०२३ परमेश्वर मुसळे, पोना/खरपडे, पोना/ सुमित इंगळे,पोशि/आकाश आराक, पोशि/म्हाळू शिंदे, पोशि/भगवान केंद्रे, पोशि/सागर राऊत, सर्व नेम.पालघर पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.